# असोसिएशन ऑफ कॉलेज ॲण्ड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युएटेड टीचर्स, महाराष्ट्र

## ५ वी, वार्षिक सर्वसाधारण सभा, नांदेड, कार्यवृत्तांत, वर्ष २०१४-२०१५

दिनांक :- १७/१२/२०१५

सभासद बंधु / भगिनिंनो,

आपल्या असोसिएशनने वर्ष २०१४-१५ या वर्षात केलेल्या कार्याचा वृत्तांत कार्यकारणीच्या वतीने मी आपल्या समोर सादर करीत आहे.

१) कार्यकारिणी बैठकी बाबत :-

अ) वर्ष २०१४-१५ या वर्षात कार्यकारिणीच्या एकूण ६ बैठका घेण्यात आल्या त्यातील महत्वाचे निर्णय आपल्या समोर ठेवत आहे.

१) दिनांक १४/१२/२०१४ रोजी कोल्हापूर येथे नवीन निवडून आलेल्या कार्यकारणीची पहिली बैठक पदाधिकारी निवडण्यासाठी घेण्यात आली व त्यात एकमताने खालील प्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | - | प्राचार्य, डॉ.एम.ए.वाहूळ |
| २) | उपाध्यक्ष | - | प्राचार्य, डॉ.जे.एम.मंत्री |
| ३) | सचिव | - | प्राचार्य, मोहम्मद शफी |
| ४) | कोषाध्यक्ष | - | प्राचार्य, एस.बी.नाफडे |
| ५) | सहसचिव | - | प्राचार्य, आर.डी.राणे |

ब) दिनांक २४/०३/२०१५, नाशिक येथे झालेल्या बैठकीमध्ये आपल्या असोसिएशनची स्वतंत्र वेब साईट विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला ज्यामुळे सदस्यांना असोसिएशनच्या एकूण कार्याची माहिती, महाराष्ट्रातील सर्व सदस्यांची अद्यावत यादी फोन नंबरसहित दिली जाईल, न्यायालयीन याचिका, याचिकाधारक आणि याचिकांचा सारांश रुपात निकाल, महाराष्ट्रातील विविध शाखा त्यांचे पदाधिकारी व असोसिएशनच्या एकंदर माहिती उपलब्ध असेल. महत्वाची वेब साईट विकसित करण्याच्या कामाची जबाबदारी नाशिक विभागाचे सचिव डॉ.एम.जी.गायकवाड यांच्यावर सोपविण्यात आली आहे. आपल्या असोसिएशनच्या वेब साईटचे नांव एक्युसॅट ACUSAT असे ठरविण्यात आले आहे.

क) यवतमाळचे क्रियाशिल सदस्य प्रा.न.मा.जोशी हे दैनिक लोकसत्ता वर्तमान पत्राचे वार्ताहर देखील आहेत त्यांनी आपल्या असोसिएशनच्या कार्याची न्यायालयीन निकालाची प्रसिध्दी सर्व महाराष्ट्रात केली असल्यामुळे त्यांना असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्याचे ठरविण्यात आले आहे.

ड) **असोसिएशनसाठी कार्यालय :-**

वर्ष २०१४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत औरंगाबादला केंद्रीय कार्यालयासाठी फ्लॅट घेणे बाबतचा ठराव पारित करण्यात आला त्या अनुषंगाने कार्यकारणीने खालील प्रमाणे कमेटी गठीत केली होती.

१) प्राचार्य, डॉ.जे.एम.मंत्री (अध्यक्ष)

२) प्राचार्य, मोहम्मद शफी (सदस्य)

३) प्रा.एस.बी.नाफडे (सदस्य)

या कमेटीने शहरात योग्य ठिकाणी कार्यालयासाठी जागेचा शोध घेऊन खरेदी बाबत निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले होते. आपणास कळविण्यास आनंद होतो की, सदर कमेटीने सिडको विभागात सध्याच्या कार्यालयापासून केवळ १ किमी अंतरावर जळगांव रोडवर रिलायन्स पेट्रोल पंपामागे ८८१ चौ.फुट चा फ्लॅट पसंत केला असून सदरची किंमत ४० लाख ठरविण्यात आली असून स्टॅम्प डयुटी अंदाजे खर्च २ लाख होईल. सदर बाबत इसार पावती करण्यात आली आहे. सदरचे बांधकाम सध्या चालू आहे.

इ) **घटना दुरुस्ती बाबत :-**

असोसिएशनची स्थापना २००९ मध्ये झाली तेव्हा महाराष्ट्राचा व्यापक विचार केला नव्हता. असोसिएशनचा विस्तार सर्व महाराष्ट्रात व सर्व विद्यापीठ विभागात झाला असून विद्यापीठ निहाय शाखा स्थापन झाल्या आहेत. कामाचा व्याप देखील वाढला आहे या सर्व बाबीचा विचार करिता घटना दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी खालील कमेटीचे गठन करण्यात आले आहे.

१) प्राचार्य, डॉ.जे.एम.मंत्री (अध्यक्ष)

२) प्राचार्य, आर.डी.राणे (जळगांव) स. सदस्य )

३) प्राचार्य, डॉ.एम.जी.गायकवाड (नाशिक) स.सदस्य

या कमेटीने घटना दुरुस्ती बाबत मसुदा आगामी वर्षात तयार करुन मान्यतेस्तव मांडावा असे ठरविण्यात आले.

ई) **विभागीय कार्यालयास सदस्य शुल्क देणे बाबत :-**

विद्यापीठ निहाय विभागीय कार्यालयाद्वारे त्या त्या विभागात सदस्यांची नोंदणी केली जाते. त्या सदस्य शुल्काच्या २५% रक्कम संबंधित कार्यालयास वर्षातून एक वेळेस देण्यात येत असे, त्या ऐवजी वरील सदस्य शुल्क वर्षातून दोन वेळेस देणे बाबतचा निर्णय घेण्यात आला या शिवाय कार्यकारणीच्या प्रत्येक बैठकीत मागील बैठकीनंतर पुढील बैठकी पर्यंत झालेल्या जमा खर्चाचा हिशोब सादर करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

२) **जिल्हा तथा विविध विद्यापीठ विभाग भेटी :-**

**१) हिंगोली जिल्हा बैठक :-**

दिनांक ०५/०१/२०१५ मार्गदर्शन प्राचार्य डॉ.जे.एम.मंत्री उपस्थिती १५

१) दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०८/२००९ या कालावधीत सेवानिवृत्तांना ५ लाख ऐवजी ७ लाख उपदान मिळणे बाबत.

२) कुंठीत वेतन वाढ संबंधी प्रगती अहवाल

३) पाचव्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तांना ६ व्या वेतन आयोगात त्यांच्या समकक्ष वेतनाच्या ५०% वेतन मिळणे बाबत.

**२) अकोला- अमरावती - नागपूर विभाग भेट : दिनांक ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१५**

मार्गदर्शक डॉ.एम.ए.वाहूळ, प्राचार्य मोहम्मद शफी, प्रा.एस.बी.नाफडे व प्राचार्य आर.डी. राणे व विभागीय अध्यक्ष डॉ.अशोक राऊत या भेटी मध्ये बैठकीच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ.एम.ए.वाहूळ राष्ट्रीयस्तरावर अध्यक्ष, प्राचार्य मोहम्मद शफी, राष्ट्रीय सचिव व प्राचार्य आर.डी.राणे विभागीय सचिव झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी बैठकीत खालील विषयावर मार्गदर्शन केले.

१) कुंठीत वेतनवाढ प्रगती अहवाल

२) सहाव्या वेतन आयोगात दोन लाख रुपये ग्रॅच्युइटीच्या फरकाची रक्कम मिळणे बाबत वंचितांना करावयाच्या कार्यवाहीची माहिती दिली.

३) इतर न्यायालयीन कामाच्या प्रगतीची माहिती देण्यात आली.

**३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक बैठक :-**

दिनांक २४/०३/२०१५ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.माणिकरावजी साळुंखे यांनी मुक्त विद्यापीठात बोलावलेल्या बैठकीस असोसिएशनचे सर्व कार्यकारी मंडळ उपस्थित होते. या बैठकीत मा.कुलगुरुंनी गरीब व होतकरु व नौकरी करणा-या विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने सुरु केलेल्या अभ्यासक्रमाची माहिती दिली व आपल्या सारख्या सेवानिवृत्ती धारकांनी त्या विद्यापीठाच्या शैक्षणिक सुधारणा, अभ्यासक्रम रचना व परिक्षा घेणेस सहकार्य, विविध अभ्यासक्रमासाठी व्हीडीओ रेकॉर्डींग वगैरे साठी सहकार्य करणेची अपेक्षा व्यक्त केली. असोसिएशनच्या वतीने मा.अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ यांनी वरील सर्व कामासाठी सहकार्य करणे संबंधी आश्वासन दिले.

**४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विभागासाठी नवीन कार्यकारणी घोषित.**

दिनांक १२/०४/२०१५

गेल्या ५ वर्षामध्ये केंद्रीय कार्यकारणीचे विभागीय सदस्यच हया विभागाचे कामकाज पहात होते. आपल्या असोसिएशनचा विस्तार महाराष्ट्रात सर्व विद्यापीठात झाल्यामुळे कामाचा व्याप वाढला आहे त्यामुळे हया विभागासाठी स्वतंत्र विभागीय कार्यकारणी गठीत करण्याचे ठरविण्यात आले. त्या नुसार या अध्यक्षांनी सर्व पदाधिका-यांशी चर्चा करुन प्राचार्य डॉ.भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय कार्यकारणी घोषित केली.

**५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.**

दिनांक १८/०६/२०१५

वर्ष २०१५ डीसेंबर मध्ये होणा-या वार्षिक सर्वसाधारण सभेचे यजमान पद नांदेड शाखेने घेतले असल्यामुळे तेथील पदाधिका-यांच्या सोबत बैठक घेऊन मार्गदर्शन करणेसाठी अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ, डॉ.जे.एम.मंत्री व प्रा.एस.बी.नाफडे व डॉ.एम.डी.जहागिरदार यांनी नांदेडला भेट दिली व सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित केली.

**६) उपदानाच्या फरकाची रक्कम वाटप :-**

दिनांक १८/०६/२०१५ उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद लाभधारक १२९ दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०८/२००९ या कालावधीमध्ये सेवानिवृत्तीधारकांना उपदान रुपये ५ लाख व दिनांक ०१/०१/२००९ पासून सेवानिवृतीधारकांना ६ व्या वेतन आयोगामध्ये रुपये ७ लाखचे उपदान देण्यात आले होते. एकाच वेतन आयोगात आधी सेवानिवृत्तीधारकांना कमी उपदान व नंतर सेवानिवृत्तीधारकांना जास्त रक्कम दिली हा असा भेदभाव करु नये म्हणून आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती त्या संबंधी निकाल आपल्या बाजुने लागला.मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे शासनाने ३९ कोटी ६४ लाख,९३ हजार रुपये महाराष्ट्रातील संबंधीत सर्व प्राध्यापकांच्या फरकाची रक्कम जमा केली होती. त्या याचिकेतील १२९ याचिका धारकांना व्याजासहित प्रत्येकी २ लाख १५ हजार १७० रुपयाचे वाटप दिनांक १८/०६/२०१५ रोजी करण्यात आले. विविध विभागातून आलेल्या सहकार्याची निवारा व भोजन व्यवस्था केंद्रीय कार्यकारिणीने केली व सर्व संबंधिताची बैठक घेऊन ग्रॅच्युइटी वाटपा संबंधी मार्गदर्शन केले. त्या दिवशी जळगांव विभाग ५७, कोल्हापूर विभाग ४२, नांदेड विभाग २० व औरंगाबाद विभाग ०३ अशा प्रकारे एकूण १२२ सदस्यांना धनादेशाचे वाटप उच्च न्यायालय खंडपीठात करण्यात आले.

**७) औरंगाबाद विभागीय शाखा बैठक औरंगाबाद :-**

दिनांक १२/०७/२०१५ विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद मार्गदर्शक - अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ, प्राचार्य डॉ.जे.एम.मंत्री, प्रा.एस.बी.नाफडे खालील विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

१) दिनांक ०१/०१/२००६ ते २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% वेतना ऐवजी शेवटच्या दहा महिन्याच्या सर्वसाधारण पगाराच्या ५०% वेतन दिले होते त्या विरुध्द आपण उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या याचिका क्र.४७३१/१४ दिनांक २७/११/२०१४ चा निकाल आपल्या बाजुने लागला त्याची माहिती दिली. या विरुध्द शासनाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन स्टे मिळविला या बाबत पुढील करावयाच्या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली.

२) २ लाख रुपये फरकाची ग्रॅच्युईटी मिळणे बाबतची करावयाची कार्यवाही.

३) ५ व्या वेतन आयोगातील सेवानिवृत्त प्राध्यापकांना ६ व्या वेतन आयोगात त्यांच्या समकक्ष वेतनाच्या ५०% सेवानिवृत्ती वेतन मिळणे बाबतच्या लढयाची माहिती देण्यात आली.

८) **उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ शाखा जळगाव बैठक :-**

दिनांक २६/०७/२०१५ जळगांव, व दि.१६/०८/२०१५ धुळे बैठक. या दोन ठिकाणी खालील विषयावर माहिती देणेसाठी पदाधिका-यांनी बैठका घेतल्या.

१) ग्रॅच्युईटी दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०८/२००९ च्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्यांना ५ लाख ऐवजी ७ लाख ग्रॅच्युईटी मिळणे चा प्रस्ताव सह संचालकास पाठविणे.

२) ६ व्या वेतन आयोगामध्ये दिनांक ०१/०१/२००६ ते २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्यांना दहा महिन्याच्या एव्हरेजच्या ५०% सेवानिवृत्ती वेतनाऐवजी त्यांच्या शेवटच्या पगाराच्या ५०% वेतन मिळणे संबंधी.

३) ५ व्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तीधारकांना ६ व्या वेतन आयोगात त्यांच्या समकक्ष वेतन श्रेणीच्या ५०% सेवानिवृत्ती वेतन मिळणे बाबत उच्च न्यायालया खंडपीठ औरंगाबाद च्या निकालाची माहिती देणे.

४) पीएच.डी. वेतन धारकांबाबत दिनांक ०१/०१/१९८६ पुर्वीच्या पीएच.डी.धारकांना तीन वेतन वाढी व दिनांक ०१/०१/१९८६ नंतर दिनांक ०१/०१/१९९६ या कालावधीत पीएच.डी. झालेल्यांना दिनांक ०१/०१/१९९६ पासून दोन अग्रीम वेतन वाढीचा लाभ मिळणे बाबतची माहिती देणे संबंधी सभा घेण्यात आल्या.

९) वरील विषया संबंधी माहिती देणेसाठी डॉ.जे.एम.मंत्री, प्राचार्य मोहम्मद शफी व प्रा.एस.बी.नाफडे यांनी खालील प्रमाणे भेटी देवून बैठका घेतल्या.

दिनांक ०२/१०/२०१५ सोलापूर — दिनांक ०३/१०/२०१५ सांगली

दिनांक ०३/१०/२०१५ कोल्हापूर — दिनांक ०४/१०/२०१५ कराड व सातारा

दिनांक १४/१०/२०१५ परभणी

३) **न्यायालीयन लढया संबंधी :-**

वर्ष २०१४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभा कोल्हापूर येथे आपण दाखल केलेल्या एकूण २४ याचिका संबंधी माहिती देऊन १६ याचिकाचा निकाल आपल्या बाजुने लागला या संबंधी माहिती देण्यात आली होती. हया २४ याचिका पैकी २० याचिका ६ व्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तीधारकांच्या होत्या. त्या सर्वांचे यशस्वी निकाल आपल्या बाजुने लागले हे विशेष होय. १६ नंतर उर्वरित याचिकाचे निकाल अथवा सद्यस्थिती तसेच नव्याने केलेल्या याचिका संबंधी माहिती या ठिकाणी देत आहे.

१) **कुंठीत वेतन वाढ संबंधी :-**

I) कुंठीत वेतन वाढीच्या सहा याचिकाच्या निकालाची कार्यवाही पुर्ण झाली आहे. ७ वी याचिका ३१४२/२०१४ चा निकाल दिनांक २५/०३/२०१४ रोजी लागून देखील त्या संबंधीची कार्यवाही दिलेल्या मुदतीत न झाल्यामुळे आपण अवमान याचिका क्र.२६८७१ दिनांक १०/०९/२०१५ रोजी दाखल केली आहे.

II) ८ वी शेवटची याचिका क्र.३२१०२ दिनांक २७/१०/२०१५ रोजी ३६ सदस्यासाठी दाखल केली आहे.

२) **ग्रॅच्युईटी बाबत :-**

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या बाजुने दिलेल्या निकालाप्रमाणे दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०८/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व प्राध्यापक तसेच महाराष्ट्रातील इतर पात्र कर्मचा-यांना ५ लाख ऐवजी रुपये ७ लाख ग्रॅच्युईटी देण्या संबंधी आदेश शासनाने दिनांक ०४/०२/२०१५ रोजी शासन आदेश (शा.नि.क्र.से.नि.वि.२०१५/प्र.क्र.१ सेवा-४) निर्गमित करुन कार्यवाही करणेचे आदेश दिले आहेत त्यानुसार संचालनालय उच्च शिक्षण पुणे यांनी दिनांक २०/०६/२०१५ रोजी सर्व सह संचालकांना पत्र पाठवून १५ दिवसात सर्व वंचित प्राध्यापकांचे प्रस्ताव मागवून संबंधीत महालेखापालाच्या कार्यालयास पाठविण्याचे आदेश दिले त्या प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात आली असून ब-याच विभागात फरकाच्या रक्कमा देण्याचे काम सुरु झाले आहे. उर्वरित ठिकाणी हे कार्य प्रगती पथावर आहे.

ग्रॅच्युईटी संबंधी दुसरी याचिका क्र.५२०६/२०१४ एकूण याचिकाकर्ते ३३३ हया प्रकरणी अंतिम निकाल अद्याप लागला नाही मात्र यातील ब-याच सदस्यांना रुपये २ लाखाच्या फरकाची रक्कम मिळाली आहे.

३) **पीएच.डी.वेतनवाढ संबंधी :-**

याचिका क्र.१०४३१/२०१२ निकाल दिनांक १५/०७/२०१४ अवमान याचिका क्र.५४५/२०१४ या विरुध्द शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एस.एल.पी.) दाखल केली आहे. मात्र यास स्थगिती न मिळाल्यामुळे उच्च न्यायालयाच्या दिनांक १५/०७/२०१४ प्रमाणे दोन वेतन वाढीची रक्कम देण्याचे आदेश शा.नि.क्र.संकीर्ण २०१४ (प्र.क्र.५९३/१३) विशि-१ दिनांक २८/०४/२०१५ मध्ये नमूद असलेल्या ९६ याचिका कर्त्यांना योजना निहाय दिनांक ०१/०१/१९९६ पासून पीएच.डी.च्या दोन वेतन वाढीची रक्कम अदा करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्या प्रमाणे ९६ याचिका कर्त्यांची रक्कम मा.प्रबंधक उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे जमा करण्यात आली असून त्याच्या वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

४) **पीएच.डी.वेतनवाढ संबंधी दुसरी याचिका :-**

दिनांक ०१/०१/१९८६ ते ३१/१२/१९९६ पर्यंत पीएच.डी.झालेल्यांना दोन वेतन वाढीचा लाभ अद्यापही कांही सदस्यांना मिळाला नाही त्या संबंधी दुसरी याचिका उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद या ठिकाणी दाखल केली आहे. (याचिकाकर्ते ३६)

**सेवानिवृत्तीवेतन सुधारणा :-**

**५ वा वेतन आयोग :-**

५ व्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तीधारकांना ६ व्या वेतन आयोगात दिनांक ०१/०१/२००६ पासून हकीम कमेटीच्या शिफारशी प्रमाणे वेतन वाढ देण्यात आली होती आपणास मान्य नसल्यामुळे त्यांना त्याच्या समकक्ष वेतनाच्या ५०% वेतनवाढ देणे आवश्यक होते या संबंधी याचिका क्र.४२९२/२०१३ मध्ये उच्च न्यायालयात दाखल केली होती त्याचा निकाल दिनांक

०९/०६/२०१५ रोजी आपल्या बाजुने लागला दिनांक ९ ऑक्टोंबर २०१५ रोजी संबंधीत आदेशाच्या अंमलबजावणीची मुदत संपली आहे. शासनाने सदर आदेशाचे पालन न केल्यामुळे आपण अवमान याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. (याचिका क्र.३३२४/१५)

**६ व्या वेतन आयोगातील याचिका क्र.४७३१/२००६ बाबत.**

दिनांक ०१/०१/२००६ ते २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांना सेवानिवृत्ती वेतन देतांना त्यांना शेवटच्या १० महिन्याच्या ॲव्हरेज वेतनाच्या ५०% वेतन देण्यात आले होते. त्याऐवजी त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% निवृत्तीवेतन द्यावे या संबंधी वरील याचिका दाखल केली होती त्या संबंधी निकाल आपल्या बाजुने लागला मात्र या विरुध्द इतर व्यक्तींनी याचिका उच्च न्यायालयात जिंकली त्या विरुध्द शासनाने सर्वोच्च न्यायालया मार्फत स्थगिती मिळविली आहे. त्या संबंधी आपण आपल्या वकीला मार्फत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सदर बाबतची सुनावणी दिनांक ०५/०१/२०१६ रोजी होणार आहे.

**वेतन सुधारणा ४ था वेतन आयोग :-**

याचिका क्र.५२०४/२०१४ याचिकाधारक ४५ सदर प्रकरणी अद्याप सुनावणी झाली नाही क़ार्यवाही लवकर व्हावी या संबंधी पाठपुरावा सुरु आहे. आपल्या माहितीस्तव.

**४) ऑल इंडिया फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स असोसिएशन, हैद्राबाद**

आपणास कल्पना आहेच की आपण आखिल भारतीय पातळीवर प्राध्यापकांच्या सेवानिवृत्त संघटनाचे सध्या नेतृत्व करीत आहोत. व आपले मा.अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ हेच राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.

हया संघटनेच्या आतापर्यंत तीन सभा घेण्यात आल्या. ७ वा वेतन आयोगाची स्थापना झाली होती ज्या त्रुटया ६ व्या वेतन आयोगामध्ये सेवानिवृत्तीधारकांना जाणवल्या त्या ७ व्या वेतन आयोगामध्ये राहू नये या साठी संबंधीत वेतन आयोग व युजीसीच्या अध्यक्षांना फेडरेशनच्या वतीने निवेदने देण्यात आली आहेत.

(१) नवीन वेतन श्रेणीच्या समकक्ष वेतनाच्या ५० टक्के सेवानिवृत्ती वेतन मिळणे बाबत.

(२) वैद्यकीय भत्ता मिळणे अथवा संबंधीत वैद्यकीय खर्चाची बिले मिळणे या बाबत.

३) विद्यापीठ अनुदान आयोग नवीन वेतन श्रेणी बाबत जी शिफारस करेल त्या पुर्ण शिफारशी राज्यांना बंधनकारक असाव्यात.

७ व्या वेतन आयोगात प्रस्तावित वेतन आपल्या माहितीस्तव देत आहे.

| | 1986 IV CPC Payscale | 1996 V CPC Payscale | 2006 VI CPC Payscale | 2016 VII CPC Payscale |
|---|---|---|---|---|
| Lect. | 2200-4000 | 8000-13500 (-S.15) | 1560-39100 (AGP.6000) (PB2) Min. Pen 10800 F.P. 6480 | 27530-84650 AGP (16420) Min.Pen.21975 F.P. 13185 |
| Senior Lecturer | 3000-5000 | 10000-15200 (S.19) Min. Pen. 5000 F.P. 3000 | 15600-39100 (AGP.7000) (PB3) Min. Pen 11300 F.P. 6780 | 43130-95770 AGP (23860) Min.Pen.33495 F.P. 20097 |
| Select Gr. Less 3 yr. | 3700-5700 | 12000-18300 (S.23) Min. Pen 6000 F.P. 3600 | 15600-39100 (AGP.8000) (PB3) Min. Pen 11800 F.P. 7080 | 44370-97010 AGP (25350) Min.Pen.34860 F.P. 20916 |
| Select Gr. 3 yr. or reader | 3700-5700 | 12000-18300 (S.24) Pen. Pre. 96 6000 F.P. 3600 | 37400-67000 (AGP.9000) (PB4) Min. Pen 23200 F.P. 13920 | 94820-161120 AGP (46830) Min.Pen.70825 F.P. 42495 |
| Principal UG. | 3700-5700 | 12000-18300 (S.24) Min. Pen 14940 F.P. 3600 | 37400-67000 (AGP.10000) (PB5) Min. Pen 23700 F.P. 14220 | 96180-162480 AGP (48480) Min.Pen.72330 F.P. 43398 |

धन्यवाद !

प्राचार्य डॉ.ज.मु.मंत्री
उपाध्यक्ष

दिनांक :- १५/११/२०१५